# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०५ // तहकूब महासभा बैठकीचे कार्यवृत्त // दि. ३०/११/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ३०/११/२०१८ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर | कापसे प्रतिभा चंद्रकांत | सोनार रंजना विजय |
| जोहरे प्रिया मधुकर | देशमुख प्रतिभा गजानन | खडके सुनिल वामनराव |
| नेरकर सरिता अनंत | सोनवणे सुरेश माणिक | खडके विश्वनाथ सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | बारी शोभा दिनकर | भंगाळे विष्णु रामदास |
| खान रुकसानाबी गबलु | शेख हसीनाबी शरीफ | तायडे ज्योती शरद |
| सोनवणे कांचन विकास | पाटील कुलभुषण विरभान | लढ्ढा नितीन बालमुकुंद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | भिल पार्वताबाई दामु | चौधरी मनोज सुरेश |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील उषा संतोष | बरडे नितीन मनोहर |
| सपकाळे मिना धुडकु | कोल्हे सिंधु विजय | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| कोळी दत्तात्रय देवराम | कोल्हे ललीत विजय | महाजन सुनिल सुपडू |
| सपकाळे रंजना भरत | बेंडाळे उज्वला मोहन | महाजन जयश्री सुनिल |
| कोल्हे प्रविण रामदास | राणे गायत्री इंद्रजित | शेख शबानाबी सादीक |
| सनकत चेतन गणेश | तायडे सुरेखा नितीन | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे भारती कैलास | चव्हाण ज्योती बाळासाहेब | पटेल इब्राहिम मुसा |
| सोनवणे मुकुंदा भागवत | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे विक्रम किसन |
| काळे अमित पांडुरंग | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे सुरेखा सुदाम | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सोनवणे धिरज मुरलीधर | ढेकळे सदाशिव गणपत | देशमुख सुन्नाबी राजु |
| काळे दिपमाला मनोज | पाटील राजेंद्र झिपरु | शेख सैईदा युसुफ |
| पाटील सचिन भिमराव | बालाणी भगतराम रावलमल | **स्विकृत सदस्य** |
| भोईटे लताबाई रणजीत | अत्तरदे रजनी प्रकाश | सोनवणे कैलास नारायण |
| पाटील प्रतिभा सुधीर | काळे रेश्मा कुंदन | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | आहुजा मनोज नारायणदास | मराठे राजेंद्र नारायण |
| कापसे मयुर चंद्रकांत | पाटील मिनाक्षी गोकुळ | चौधरी महेश रतन |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरिता **चौधरी मंगला संजय, सोनवणे लताबाई चंद्रकांत व सोनवणे राखी शामकांत** यांचे रजेचे अर्ज आलेले असून ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

श्रध्दांजलीबाबत सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाचे नगरसचिव यांनी वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२९ पारित करण्यात आला.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.सिमा सुरेश भोळे,महापौर | भा.ज.पा. पक्षाचे जेष्ठ नेते, माजी खासदार स्व.वाय.जी.महाजन, मा.आ.श्री.एकनाथरावजी खडसे यांचे जेष्ठ बंधु स्व.विश्वनाथ गणपतराव खडसे, भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते व केंद्रीय रासायनीक खते आणि संसदीय कामकाज मंत्री कै.अंनतकुमार, सन्मा.सदस्या रंजना विजय सोनार (वानखेडे) यांचे वडील कै.प्रकाश एकनाथ सोनार, माजी नगरसेविका सौ.शुभांगी सुधाकर भोळे यांचे पती स्व.प्रा.सुधाकर दोधू भोळे, माजी नगरसेवक श्री.अरुण शिरसाळे यांचे चिरंजीव स्व.मानराज शिरसाळे यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री.ललित विजयराव कोल्हे | भा.ज.पा. पक्षाचे जेष्ठ नेते, माजी खासदार स्व.वाय.जी.महाजन, मा.आ.श्री.एकनाथरावजी खडसे यांचे जेष्ठ बंधु स्व.विश्वनाथ गणपतराव खडसे, माजी नगरसेविका सौ.शुभांगी सुधाकर भोळे यांचे पती स्व.प्रा.सुधाकर दोधू भोळे यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| ३. | श्री.भगतराम रावलमल बालाणी | माजी नगरसेवक श्री.अरुण शिरसाळे यांचे चिरंजीव स्व.मानराज शिरसाळे तसेच लेवा भोर पंचायतचे उपाध्यक्ष,कै.श्यामलाताई गुणवंतराव सरोदे यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| ४. | श्री.विष्णु रामदास भंगाळे | जिल्हापेठ येथिल रहिवासी श्री.अशोक हरलाल खैरनार यांचे मातोश्री कै.जनाबाई हरलाल खैरनार, मारोती पेठ रथ चौक येथिल श्री.किशोर जगन्नाथ सुर्यवंशी यांचे बंधु व प्रज्वल अशोक सुर्यवंशी यांचे वडील कै.अशोक जगन्नाथ सुर्यवंशी, भवानी पेठ येथिल श्री.विलास, लिलाधर व राजू पुरुषोत्तम नारखेडे यांचे वडील कवि कै.पुरुषोत्तम चावदस नारखेडे यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| ५. | श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | मराठा समाजाचे आरक्षणासाठी राज्यभर ज्या चाळीस तरुणांनी बलिदान दिले त्यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| ६. | सौ.दिपमाला मनोज (पिंटू) काळे | प्रभाग क्रं.०७ मधील रहिवासी कै.राजेंद्र जगन्नाथ शिरुडे, कै.गं.भा.द्रौपदाबाई खुशाल चौधरी, कै.गं.भा.कुसूम बेनिराम किरंगे, कै.सौ.चित्रा कमलाकर फालक, कै.सौ.प्रतिभा हरिश्चंद्र भंगाळे यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| ७. | श्री.राजेंद्र झिपरु पाटील | १० वर्षापुर्वी दि.२६/११/२००८ रोजी मुंबई हल्ल्यात शहीद झालेले पोलिस अधिकारी, मिल्ट्रीचे जवान व नागरिक तसेच सन्मा.सदस्या रंजना विजय सोनार (वानखेडे) यांचे वडील कै.प्रकाश एकनाथ सोनार यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| ८. | श्री.प्रविण रामदास कोल्हे | जुने जळगांव परिसरातील कोल्हेवाडा येथिल स्व.वंदना रमेश कोल्हे, वाल्मिक नगर येथिल रहिवासी माजी प्र.महापौर श्री.गणेश बुधो सोनवणे यांचे मावस भाऊ स्व.प्रकाश दगडू साळुंखे यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| ९. | डॉ.श्री.विश्वनाथ सुरेश खडके | भा.ज.पा. पक्षाचे जेष्ठ नेते, माजी खासदार स्व.वाय.जी.महाजन, सन्मा.सदस्या रंजना विजय सोनार (वानखेडे) यांचे वडील कै.प्रकाश एकनाथ सोनार, यांचे दुखद निधनाबद्दल श्रध्दांजली. |
| १० | श्री.कैलास नारायण सोनवणे | भारतीय जिवनशैलीत बालधर्म, शिक्षणधर्म, कर्म धर्म वृध्दा अवस्थेतीतील धर्म, आणि सर्व भौतिक सुखापासुन विरक्ती स्वीकारणारा संन्यास धर्म दिलेले आहेत. आयुष्यात सर्व धर्माचे पालन झुंबरलालजी यांनी केले वयाच्या ९३ व्या वर्षी सर्व संघ परित्याग करुन त्यांनी संन्यासव्रत स्वीकारले हे व्रत अंगीकारल्यानंतर त्यांनी संथराव्रत घेऊन निग्रहाने ५७ दिवस उपवास करुन मृत्युव्दार पार केले. त्यांच्या या व्रतामुळे जैन धर्मातील काया, माया पासुन विस्त होणारा संस्कार अधोरेकीत झाला. जळगांव करांनी मृत्युचा आनंददायी सोहळा अनुभवला. अश्या निग्रही व निश्चयी जैन मुनी झुंबरलालजी यांना हे सभागृह श्रध्दाजंली वाहते. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दुःखद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दुःख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दुःखात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या अभिनंदन प्रस्तावाचे अनुषंगाने सभागृहाने ठराव क्र.३० अन्वये खालील नमूद केलेप्रमाणे ठराव पारित केला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | सौ.सिमा सुरेश भोळे,<br>महापौर<br>डॉ.श्री.अश्विन शांताराम,<br>उपमहापौर | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी महाराष्ट्र राज्यात मराठा समाज बांधव यांना शिक्षण व नोकरीत १६ टक्के आरक्षण दिल्याबद्दल, मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, जलसंपदा मंत्री, यांनी आरक्षण देणे कामी महत्वाची भुमिका बजावल्याबद्दलआभार व्यक्त करणेसाठी हार्दिक अभिनंदन. श्री.जितेंद्र भगवान मराठे यांची जळगांव शहर महानगरपालिका स्थायी समिती सभापती निवड झालेबद्दल, सौ.मंगला संजय चौधरी यांची जळगांव शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निवड झाल्याबद्दल, श्री.कैलास नारायण सोनवणे, श्री.विशाल राधेशाम त्रिपाठी, श्री.राजेंद्र नारायण मराठे, श्री.महेश रतन चौधरी, श्री.भागचंद मोतीलाल जैन यांची जळगांव शहर महानगरपालिकेच्या स्विकृत सदस्य निवड झाल्याबद्दल तसेच जळगांव शहरातील स्वयंसेवी नागरीक श्री.संजय श्रीराम चौधरी हे जळगांव शहरातील मुख्य स्मशान भुमी येथे निगा आणि स्वच्छता ठेवणेसाठी विठोबा नावाने स्वयंसेवक म्हणुन बहुमोल सेवा बजावित असल्याबद्दल त्यांचे कौतुकास्पद, गौरवणिय कामगिरीसाठी अभिनंदन. |
| २ | श्री.ललित विजयराव कोल्हे | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी महाराष्ट्र राज्यात मराठा समाज बांधव यांना शिक्षण व नोकरीत १६ टक्के आरक्षण दिल्याबद्दल, मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, जलसंपदा मंत्री, यांनी आरक्षण देणे कामी महत्वाची भुमिका बजावल्याबद्दल आभार व्यक्त करणेसाठी हार्दिक अभिनंदन. तसेच मा.श्री.चंद्रकांत डांगे,भाप्रसे,आयुक्त, मनपा, आणि मनपा अधिकारी व कर्मचारी वृंद यांनी सार्वजनिक गणेशोत्सव २०१८ मध्ये यावर्षी मनपातर्फे जळगांवकरांना विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करुन जळगांव रसिकांना शास्त्रीय नृत्य, नाटक, संगीत मैफिल आणि विर्सजन मिरवणुकीत सादर केलेले विविध कलाविष्कार यांची मेजवानी जळगांववासियांना उपलब्ध करुन दिली याबद्दल अभिनंदन. |
| ३ | डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी महाराष्ट्र राज्यात मराठा समाज बांधव यांना शिक्षण व नोकरीत १६ टक्के आरक्षण दिल्याबद्दल, मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, जलसंपदा मंत्री, यांनी आरक्षण देणे कामी महत्वाची भुमिका बजावल्याबद्दल आभार व्यक्त करणेसाठी तसेच संपूर्ण मराठा समाज बांधवांचे हार्दिक अभिनंदन. |
| ४ | डॉ.श्री.विश्वनाथ सुरेश खडके | मनपा स्विकृत सदस्य श्री.महेश रतन चौधरी यांचे वाढदिवसाबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५ | प्रा.श्री.सचिन भिमराव पाटील | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी महाराष्ट्र राज्यात मराठा समाज बांधव यांना शिक्षण व नोकरीत १६ टक्के आरक्षण दिल्याबद्दल, मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, जलसंपदा मंत्री, मा.आ.श्री.चंदूभाई पटेल व मा.आ.श्री.राजुमामा भोळे यांनी आरक्षण देणे कामी महत्वाची भुमिका बजावल्याबद्दल आभार व्यक्त करणेसाठी हार्दिक अभिनंदन. |
| ६ | सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण | महाराष्ट्र राज्यात मराठा समाज बांधव यांना शिक्षण व नोकरीत १६ टक्के आरक्षण दिल्याबद्दल मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, व विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहातील सर्व पक्षीय सदस्यांची एकमताने विधेयक मंजूर केल्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक आभार व हार्दीक अभिनंदन. तसेच पहिल्यांदा महानगरपालिका स्वच्छ व चकाचक केल्याबद्दल मा.महापौर,सौ.सिमा सुरेश भोळे, मा.उपमहापौर डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे, आणि मा.आयुक्त, श्री.चंद्रकांत डांगे यांचे हार्दीक अभिनंदन करते. |
| ७ | श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | आरक्षणच्या मागणीसाठी मराठा समाजाने राज्यभर शांततेच्या मार्गाने काढलेले ५८ मुक मोर्चे याबद्दल १६% आरक्षण दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे हार्दीक अभिनंदन. |
| ८ | सौ.दिपमाला मनोज (पिंटू) काळे | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणविस,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी महाराष्ट्र राज्यात मराठा समाज बांधव यांना शिक्षण व नोकरीत १६ टक्के आरक्षण दिल्याबद्दल, मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, जलसंपदा मंत्री, तसेच जिल्हयाचे पालकमंत्री ना.श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी आरक्षण देणे कामी महत्वाची भुमिका बजावल्याबद्दल आभार व्यक्त करणेसाठी हार्दिक अभिनंदन. तसेच जळगांव शहरातील स्वयंसेवी नागरीक श्री.संजय श्रीराम चौधरी हे जळगांव शहरातील मुख्य स्मशान भुमी येथे निगा आणि स्वच्छता ठेवणेसाठी विठोबा नावाने स्वयंसेवक म्हणुन बहुमोल सेवा बजावित असल्याबद्दल त्यांचे कौतुकास्पद, गौरवणिय कामगिरीसाठी अभिनंदन. मनपा स्विकृत सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | श्री.महेश रतन चौधरी यांचे वाढदिवसाबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ९ | श्री.विष्णु रामदास भंगाळे | महाराष्ट्र राज्य सरकारने जाहीर केलेल्या मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकारचे व सभागृहातील सर्व पक्षांनी घेतलेल्या भुमीकेबद्दल सर्व पक्षीयांचे जाहीर हार्दीक अभिनंदन. |
| १० | श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा | जळगांव शहरातील एक प्रमुख समस्या राष्ट्रीय महामार्ग क्रं.६ चे बाजुने समांतर रस्ते करणे संदर्भात समांतर रस्ते कृती समितीने आंदोलने केले होते व याकामी मा.जलसंपदा मंत्री गिरीषभाऊ महाजन, मा.आ.श्री.सुरेश भोळे, केंद्रीय मंत्री नामदार श्री.नितीनजी गडकरी, मा.पालकमंत्री श्री.चंद्रकांतजी पाटील, मा.खा.श्री.ए.टी.नाना पाटील जे प्रयत्न केले त्याबद्दल या सर्वांचे हे सभागृह हार्दीक अभिनंदन करीत आहे. कारण बऱ्याच वर्षापासून हा प्रश्न प्रलंबीत होता व असंख्य लोक या महामार्गावर मृत्युमुखी पडलेले आहेत. यासंदर्भात मा.गिरीषभाऊ महाजन, मा.आ.श्री.सुरेश भोळे यांनी मागे विमानतळावर श्री.गडकरी यांचे स्विय सहाय्यक यांची भेट घेतली होती व हा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यास सांगीतले होते त्यावेळेस त्यांनी दोन तीन आठवडयात याकामाच्या निविदा काढण्यात येतील असे सांगीतले होते. याअनुषंगाने या रस्त्याचे कामी येणाऱ्या अडचणी जसे की, विदयुत पोल, वृक्ष, पाईप लाईन इ.समस्या दुर करणे संदर्भात सर्व संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली होती त्यामध्ये आठ दिवसात हया अडचणी दुर करण्यात येतील असे सांगीतले होते. तरी सर्व लोकप्रतिनिधी यांचे हे सभागृह हार्दीक अभिनंदन करीत आहे. खास करुन मा.आ.श्री.सुरेशमामा भोळे यांनी गेल्या चार वर्षात हे एक ठोस असे काम केले आहे. कारण याकामी रस्त्यामधिल विदयुत पोल स्थलांतरीत करणे गरजेचे होते व त्यासाठी निधीची आवश्यकता होती त्याकरीता १.५० कोटी रुपये जिल्हा नियोजन कार्यालयाकडून मिळावे यासाठी मा.पालकमंत्री श्री.चंद्रकांतजी पाटील यांना मा.आ.श्री.सुरेश भोळे यांनी पत्र दिले म्हणुन त्यांचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

मा.उपमहापौर :- मा.महापौर यांची विनंती आहे की, शिवाजी नगर येथिल जे रहिवाशी सभागृहात आलेले आहेत त्यांनी कृपया सभागृहा बाहेर जावे.

श्री. सांगोरे :- मा.महापौर महोदया यांचेकडून आम्ही सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी पासेस घेतलेल्या आहेत.

मा.उपमहापौर :- ठिक आहे परंतू आपण सभागृहात खाली न बसता खुर्ची किंवा सोफा वर बसावे.

श्री.दिपक गुप्ता :- बसण्यास जागा नसल्याने मी खाली बसलो आहे.

मा.उपमहापौर :- आपण सोफ्यावर बसुन घ्यावे आपली बसण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

श्री.नवनाथ दारकुंडे :- सभेचे कामकाज सुरु होण्याआधी मी मा.आयुक्त साहेब यांना विचारु इच्छितो की, आम्ही वार्डातील समस्या कोणाकडे कराव्यात ? कारण प्रशासनाला समस्या संदर्भात पत्र देऊन सुध्दा त्या सोडवल्या जात नाही.

म.आयुक्त :- आपण पत्र दिले असेल तर त्यावर कार्यवाही करणेत येईल.

श्री.नवनाथ दारकुंडे :- एक वर्षापासून तक्रार केलेली आहे दि.१०/१०/२०१७ रोजी मी स्मशानभुमी संदर्भात तक्रार केलेली होती तसेच जन्म-मृत्यु दाखल्या संदर्भातही पत्र दिले होते परंतू काहीही कार्यवाही झालेली नाही.

मा.उपमहापौर :- आपण प्रशासनाला पुर्वी जी पत्र दिली आहेत त्याची एक प्रत पुन्हा दयावी त्यावर प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विशाल त्रिपाठी :- मा.महापौर महोदया, आपण सभागृहात जे श्रध्दाजंली व अभिनंदनाचे जे ठराव करतो त्यासंदर्भात एक लेखी पत्र संबंधीत कुटूंबाला देण्यात यावे.

श्री.सुनिल महाजन :- मा.महापौर महोदया, स्विकृत सदस्य यांचे राजपत्रात नावे प्रसिध्द झालेली नसल्याने ते सभेला उपस्थित राहू शकत नाही.

नगरसचिव :- शासकिय मुद्रणालय, येरवडा यांचेकडे प्रस्ताव दिलेला आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ अन्वये स्विकृत सदस्य नियुक्त्या होतात व कलम ६ नुसार त्यांचे नावे राजपत्रात प्रसिध्द करणे तसेच पालिका सचिव राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठवतील , तसेच प्रमाणपत्र देणे बाबत नमूद केलेले आहे. नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे शक्य तितक्या लवकर पालिका सचिव, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठवील. तसेच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर आयुक्त, यासोबत जोडलेल्या नमुन्यात प्रत्येक नामनिर्देशित पालिका सदस्यांना प्रमाणपत्र देईल. प्रमाणपत्राचा नमुना ८ सुध्दा यामध्ये दिलेला आहे. म्हणजे यांची नावे अधिकृतरित्या राजपत्रात प्रसिध्द होईल व आयुक्त यांचेकडून या सदस्यांना प्रमाणपत्र दिले जाईल असा आहे. परंतू याचा कुठेही अभ्यास केला गेलेला नाही. त्यामुळे हे बेकायदेशिर आहे यांची

निवड कायदेशिर ठरणार नाही. तरी आपणाकडून चूक होणार नाही याची आपण दखल घ्यावी. याची जबाबदारी नगरसचिव यांचेवर आहे.

श्री.कैलास सोनवणे :- आम्हाला सभेचा अजेंडा मिळाला आहे म्हणुन आम्ही सभेला हजर आहोत.

म.आयुक्त :- स्विकृत सदस्य यांचे बद्दल प्रोसिजर दिलेली आहे परंतू सदस्यांना सभा कामकाजात सहभाग घेऊ दयावा किंवा नाही याचा कुठेही उल्लेख नाही.

श्री.नितीन लढ्ढा :- समजा मा.मुख्यमंत्री महोदय यांनी श्री.डांगे सो यांची या ठिकाणी नियुक्तीस मान्यता दिली परंतू अधिकृत आदेशाशिवाय ते रुजू होवू शकत नाही त्यामुळे आयुक्त नामनिर्देशित सदस्यांना प्रमाणपत्र देतील व त्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द होतील त्यावेळेसच हे सदस्य सभागृहात बसु शकतील. त्यामुळे हे सदस्य सभागृहात बसु शकत नाही ही कृती बेकायदेशिर आहे. सदस्य सभागृहात बसण्यास माझा काहीही विरोध नाही परंतू असा चुकीचा पायंडा पाडला जावु नये अशी माझी विनंती आहे.

मा.महापौर :- माझे अधिकारात मी या सदस्यांना सभागृहात बसण्यास परवानगी देत आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- परंतू हे पुर्ण बेकायदेशिर आहे.

श्री.कैलास सोनवणे :- मागील पंचवार्षिकमध्ये गॅझेटमध्ये नांव प्रसिध्द झाले नव्हते तरी देखिल सदस्यांना सभागृहात बसण्यास परवानगी दिली होती व सभा झाली होती.

श्री.नितीन लढ्ढा :- परंतू हा चुकीचा पायंडा पाडत आहे.आयुक्त साहेब यांनी यासंदर्भात आपले मत दयावे व त्याची सभेच्या कामकाजामध्ये नोंद घ्यावी.

श्री.सदाशिव ढेकळे :- मागील वेळेत मी सुध्दा सदस्य होतो त्यावेळेस देखिल सदस्यांना सभेत बसु दिले जात होते.

श्री.अनंत जोशी :- भाजपा हा पार्टी विंथ डिफरंट पक्ष आहे मग मागे जी चुक झाली ती तुम्ही आता कां करता ?

**(अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असल्याने बऱ्याच वेळ सभागृहात गोंधळाची परिस्थिती होती.)**

मा.महापौर :- सर्व सदस्यांनी खाली बसुन घ्यावे.

मा.उपमहापौर :- सदस्यांनी मा.महापौर यांची परवानगी घेऊनच बोलावे.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.महापौर महोदया, या सदस्यांना सभागृहात बसु देण्याचा आपला अधिकार आहे परंतू या संदर्भात आयुक्त किंवा नगरसचिव यांचे मत काय आहे ते घेण्यात येऊन त्यांची सभाकामजात नोंद घेण्यात यावी.

मा.महापौर :- मी निर्णय दिलेला आहे.

मा.उपमहापौर :- सभेपुढे महत्वाचे विषय आहेत त्यावर आपल्याला चर्चा करावयाची आहे.

श्री.अनंत जोशी :- श्री.कैलासअप्पा सोनवणे व श्री.विशालभाऊ त्रिपाठी हे अभ्यासु सदस्य आहेत त्यांनी तर सभागृहात यायलाच नको होते. सचिन तेंडुलकरच्या बाबतीत जर का पंचानी चुकीचा निर्णय दिला तरी ते सरळ मैदानाचे बाहेर निघून जात असत. त्याप्रमाणे आपण सुध्दा वागले पाहीजे.

श्री.कैलास सोनवणे :- आजच्या सभेत जे विषय आहेत त्याबद्दल मला काल २० ते २५ वेळा फोन आले होते. मला सांगीतले गेले की तुमच्यावर दबाव येऊ शकतो म्हणुन मी काल माझा फोन सुध्दा बंद करुन ठेवला होता.

श्री.नितीन लढ्ढा :- श्री.कैलासअप्पा हे नगरसेवक असतील तरच त्यांचे मनपात कामे होतील असे काही नाही त्यांचे असेही काम होतात.

मा.उपमहापौर :- बंटीभाऊ परवानगी घेऊन बोलावे.

श्री.अनंत जोशी :- परवानगी न घेता मी बोलायला लागलो त्याबद्दल क्षमा असावी यापुढे मी परवानगी घेऊनच बोलेल.

श्री.नितीन लढ्ढा :- आयुक्त यांचे कायदेशिर मत घेऊन त्याची नोंद घेण्यात यावी.

श्री.कैलास सोनवणे :- मला सभेच्या विषयावर बोलायचे होते त्याकरिता मी गेले १० दिवस या एका विषयाचा अभ्यास केलेला आहे त्यामुळे मी सभेला बसू किंवा नाही ? मागील वेळेस असाच मी एक घोटाळा काढला होता.

श्री.प्रशांत नाईक :- विषय पत्रिकेवर हे विषय कोठून आले ?

श्री.कैलास सोनवणे :- हे मागील दिड वर्षाचे आहेत.

मा.महापौर :- आजची सभा तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, आज दिनांक ३०/११/२०१८ रोजी आयोजित महासभा काही अपरिहार्य कारणास्तव तहकूब ठेवणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सही/-**
**(भोळे सिमा सुरेश)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**